जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ८१ दिनांक - ३०/०१/२०२४

सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

# पिडीत मुलीचा अश्लील व्हिडीओ सोशल मिडियावर प्रसारीत करणा-या आरोपीस गोवा राज्यात शोध घेवुन सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे यांनी केले जेरबंद

दि.१८/०१/२०२४ रोजी तक्रारदार पिडीत मुलगी हिला अश्लील व्हिडीओ कॉल करणेस भाग पाडुन तो व्हिडीओ कॉल रेकॉर्ड केला होता. त्यानंतर त्यांचा ब्रेकअप झाल्याने त्याचा राग मनात धरुन सदरचा व्हिडीओ फेक इन्स्टाग्राम आयडी बनवुन तसेच युट्युब वर लिंक बनवुन अश्लील व्हिडीओ सोशल मिडियावर प्रसारीत केल्याबद्दल पिडीत मुलीने फिर्याद दिल्याने सहकारनगर पोलीस ठाणे पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना पिडीत मुलीने दिलेल्या माहितीच्या आधारे सदर व्हिडीओ कोणी प्रसारीत केला त्याबाबत काही माहिती नसताना तसेच आरोपीचा कोणताही ठाव ठिकाणा नसताना सदर बाबत तांत्रिक विश्लेषन करुन तसेच माहिती मिळवुन संशयीत आरोपी हा गोवा राज्यात पणजी येथे कोणत्यातरी पंचतारांकित हॉटेल मध्ये नोकरीस असले बाबत माहिती काढली. परंतु कोणत्या पंचतारांकित हॉटेलमध्ये आहे त्याची माहिती मिळाली नाही. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुरेंद्र माळाळे, यांचे मार्गदर्शनाखाली व सुचने प्रमाणे आरोपीचा शोध घेणेकामी सहकारनगर पोलीस स्टेशन कडील **सहा.पोलीस फौजदार सोपान नावडकर, पोलीस अंमलदार अमोल पवार,निलेश शिवतरे,सागर सुतकर, निखील राजीवडे** असे मा.वरिष्ठांचे परवानगीने गोवा राज्यामधील पणजी येथे जावुन आरोपीचा वेगवेगळया पंचतारांकित हॉटेल मध्ये ४ दिवसांपासुन शोध घेत होते. सदर आरोपी हा ज्या पंचतारांकित हॉटेल मध्ये कामास आहे त्याबाबत माहिती मिळवुन सदर हॉटेलचे बाहेर सापळा रचुन संशयीत आरोपी हा हॉटेलमधील काम संपवुन घरी जात असताना हॉटेलचे बाहेर आला असता त्यास ताब्यात घेवुन सदर इसमाचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **विनय मारुती शेकापुरे वय २३ वर्ष रा.गणेश कृपा,नालंदा कॉलनी,मिरमार पणजी गोवा मुळ रा.मु.पो.मुखेड ता.मुखेड,जि.नांदेड** असे सांगितले त्यास दाखल गुन्हयाबाबत विचारणा केली असता त्याने पिडीत मुलीचा इन्स्टाग्राम व युट्युब वर अश्लील व्हिडीओ सोशल मिडियावर शेअर केले बाबत कबुली दिल्याने सदर आरोपीस गोवा राज्यातुन सहकारनगर पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन मा.न्यायालयाने त्याची तपासकामी पोलीस कस्टडी दिली आहे.पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुरेंद्र माळाळे हे करीत आहेत.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील, सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,श्रीमती नंदिणी वग्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पो.स्टे.श्री.सुरेंद्र माळाळे, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, स.पो.फौ.सोपान नावडकर,पोलीस अंमलदार अमोल पवार, निलेश शिवतारे,सागर सुतकर,निखील राजीवडे यांनी केली आहे.